जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक २३७ | सोमवार, २३ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### मुलगी पाहायला येण्यासाठी नकार दिल्याने तरुणावर हल्ला

**बीड, ता. २२ :** बीड जिल्ह्यातील लिंबागणेश परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाने हिंसक रूप धारण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुलगी पाहण्यासाठी सोबत येण्यास नकार दिल्याने एका २१ वर्षीय तरुणावर तिघांनी हल्ला केला, तर त्याला वाचवण्यासाठी पुढे आलेल्या पती-पत्नीलाही मारहाण करण्यात आली. मि ळालेल्या माहितीनुसार, कृष्णा रामदास थोरात हा १८ मार्च रोजी रात्री बाजारतळ परिसरातून आपल्या शेताकडे जात होता. त्यावेळी औदुंबर थोरात, विशाल थोरात आणि बाळू थोरात यांनी त्याला रस्त्यात अडवून एका मुलीला पाहण्यासाठी सोबत येण्याची विनंती केली. मात्र घरी कोणी नसल्यामुळे कृष्णाने जाण्यास नकार दिला. या साध्या कारणावरून आरोपी संतापले आणि त्यांनी त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात आरोपींनी कृष्णाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच लोखंडी गजाने त्याच्या चेहऱ्यावर प्रहार करण्यात आल्याने तो गंभीर जखमी झाला.

# उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचा उरुळी कांचन येथील दौरा नागरिकांच्या मुळावर

## वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला; विद्यार्थ्यांचा बसमधून धोकादायक प्रवास

**लोणी काळभोर, ता. २२ :** देशाचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या दौऱ्यासाठी केलेल्या अतिशय कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे रविवारी (ता.२२) पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गासह उरुळी कांचन आणि लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरातील अंतर्गत रस्ते पूर्णपणे बंद करण्यात आले. या निर्णयाचा फटका मात्र थेट सर्वसामान्य नागरिक आणि हजारो विद्यार्थ्यांना बसला असून, प्रशासनाच्या नियोजनशून्यतेमुळे प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

उरुळी कांचन येथील निसर्गोपचार आश्रमाचा स्थापना दिन सोहळा व सिक्रेट्स ऑफ अवर हॅपिनेस या पुस्तकाचे प्रकाशनासाठी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आले होते, तर त्याच वेळी लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात पोलीस भरतीची परीक्षा देण्यासाठी तब्बल ५ हजारांहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. या दोन्ही मोठ्या कार्यक्रमांचे नियोजन एकाच दिवशी आणि एकाच परिसरात केल्याने वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



रविवारी सकाळी दहापासूनच महामार्गावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. परीक्षा संपल्यानंतर हजारो विद्यार्थी एकाच वेळी बाहेर पडल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली. बसस्थानकांवर विद्यार्थ्यांची झुंबड उडाली होती आणि अनेकांना जीव धोक्यात घालून बसच्या दरवाज्याला लटकून प्रवास करावा लागत होता. प्रशासनाने विद्यार्थ्यांसाठी कोणतीही पर्यायी वाहतूक व्यवस्था न केल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, उपराष्ट्रपतींच्या सुरक्षेच्या कारणास्तव उरुळी कांचन परिसरातील अंतर्गत रस्ते बंद करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या घराजवळ पोहोचण्यासही अडचणी निर्माण झाल्या. अनेक ठिकाणी पोलिसांनी वाहनधारकांना गाडी इथेच लावा आणि पायी जा असे सांगितल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. महागडी वाहने रस्त्यावर सोडून जाण्याची भीती असल्याने अनेकजण तासनतास गाड्यांमध्येच अडकून बसले. या संपूर्ण घटनेत पोलिस आणि प्रशासनाची नियोजन क्षमता पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसून आले. एका बाजूला व्हीआयपींच्या सुरक्षेला प्राधान्य देताना दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिकांचे हाल होत असल्याचे चित्र स्पष्टपणे समोर आले. व्हीआयपी संस्कृतीमुळे सामान्यांना का त्रास सहन करावा लागतो? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### लोणी स्टेशन परिसरात वाहतूक कोंडी

लोणी स्टेशन परिसरात अचानक वाढलेल्या वाहनांच्या गर्दीमुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळी परिस्थिती अधिकच बिघडली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.या कोंडीमुळे प्रवाशांना तासनतास रस्त्यावर अडकून पडावे लागले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वाहतूक पोलिसांना अक्षरशः धावपळ करावी लागली. सिग्नल व्यवस्था आणि अरुंद रस्त्यांमुळे कोंडी अधिक तीव्र झाली होती. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांनी पर्यायी मार्गांवर वाहनांचे वळवणे, हाताने वाहतूक नियंत्रित करणे अशा उपाययोजना केल्या. मात्र वाहनांची संख्या मोठी असल्याने कोंडी पूर्णपणे निवळण्यासाठी बराच वेळ लागला.

### प्रशासनाचे नियोजन सपशेल फेल

उपराष्ट्रपतींचा दौरा आणि हजारो विद्यार्थ्यांची परीक्षा या दोन्ही गोष्टी पूर्वनियोजित असतानाही वाहतूक व्यवस्थेचे कोणतेही ठोस नियोजन करण्यात आले नव्हते. पर्यायी मार्ग, अतिरिक्त बससेवा किंवा टप्प्याटप्प्याने परीक्षा संपवण्यासारख्या उपाययोजना केल्या असत्या तर ही परिस्थिती सहज टाळता आली असती. मात्र प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे रविवारी संपूर्ण परिसरात अराजकतेसारखी स्थिती निर्माण झाली.

# नेरळमध्ये बनावट दारूचा मोठा साठा जप्त; एक कोटींचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात

**रायगड, ता. २२ :** नेरळ पोलिसांनी अवैध दारू तस्करीविरोधात मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी १ लाख २७ हजार ६०० रुपयांचा बनावट दारूचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी राजस्थानमधील एका आरोपीला अटक करण्यात आली असून, या कारवाईमुळे राज्यभर पसरलेल्या दारू तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



गुप्त माहितीच्या आधारे नेरळ पोलिसांनी शनिवारी (ता.२१ मार्च) रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास कर्जतमुरबाड मार्गावरील वारे गाव हद्दीत कोकण किनारा हॉटेल समोर सापळा रचला. या वेळी क्रमांकाच्या टाटा टँकरमधून विनापरवाना गोवा बनावटीची दारू वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले.

तपासादरम्यान टँकरमध्ये तयार करण्यात आलेल्या गुप्त कप्प्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सीलबंद दारू साठवलेली आढळली. पोलिसांनी तात्काळ टँकरसह संपूर्ण साठा जप्त करत चालक दादूराम शिखाराम बिश्नोई (वय ४२, रा. राजस्थान) याला ताब्यात घेतले.


या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईतून अवैध मार्गाने राज्यात मोठ्या प्रमाणात बनावट दारूची तस्करी केली जात असल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिसांनी या मागील मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, पोलीस उपनिरीक्षक सुशील शेंबडे आणि त्यांच्या पथकाने केली.

# अशोक खरात नंतर आणखी एका भोंदूबाबाचा कारनामा उघड!

**नांदेड, ता. २२ :** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणामुळे राज्यभरात खळबळ माजलेली असतानाच नांदेडमध्येही तत्सम स्वरूपाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. धार्मिक स्थळाशी संबंधित व्यक्तीवरच महिलेला फसवून अत्याचार केल्याचा आरोप झाल्याने या घटनेने संताप व्यक्त केला जात आहे.

नांदेड शहरातील गाडीपुरा परिसरातील एका मठातील संत हरीगीर दत्तगीर गिरी महाराज (वय ३८) यांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली आहे. ४६ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे. पोलिसांनी संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.




पीडित महिला १२ मे २०२५ रोजी मठात दर्शनासाठी गेल्या असताना तिची आरोपी म हाराजाशी ओळख झाली. त्यानंतर मोबाईलवरून संपर्क वाढत गेला आणि पुढे जवळीक निर्माण झाली. या काळात महाराजाने महिलेला लग्नाचे आश्वासन दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. जून महिन्यात महिलेने त्यांना गुरु मानले होते, त्यामुळे विश्वास अधिक दृढ झाला.

मात्र, पुढे या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने महिलेच्या घरी जाऊन शारीरिक संबंधांची जबरदस्ती केल्याचा आरोप आहे. त्यानंतर लग्नाबाबत विचारणा केल्यावर मी संन्याशी आहे, लग्न करू शकत नाही असे सांगत पैसे देऊन प्रकरण मिटवण्याचा दबाव टाकल्याचेही समोर आले आहे.

या घटनेमुळे धार्मिक ठिकाणांम धील विश्वास आणि सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. श्रद्धेच्या नावाखाली लोकांचा विश्वास संपादन करून त्याचा गैरवापर केल्याच्या घटना वाढत असल्याने प्रशासन आणि समाजाने अधिक सतर्क राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. भाग्यनगर पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

# शिरूरमध्ये दोन खून, एकच पॅटर्न; ग्रामस्थ आक्रमक

**पुणे, ता. २२ :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील दहिवडी गावात १२ वर्षीय मुलाच्या निर्घृण हत्येनंतर संपूर्ण परिसर संतापाने पेटून उठला आहे. या घटनेने केवळ गावच नाही, तर संपूर्ण राज्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून ग्रामस्थांचा रोष उफाळून आला आहे.



या घटनेनंतर दहिवडी गावात शोक आणि संताप यांचे मिश्र वातावरण पाहायला मिळत आहे. निष्पाप मुलाचा जीव गेल्याने ग्रामस्थ भावनिक झाले असून आरोपीला तात्काळ आणि कठोर शिक्षा व्हावी, अशी एकमुखी मागणी होत आहे. गावातील अनेकांनी रस्त्यावर उतरून निषेध व्यक्त केला असून, अशा आरोपीला समाजात जागा नाही, अशी तीव्र भावना व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, याच आरोपीने यापूर्वीही अशाच प्रकारचा गुन्हा केल्याची माहिती समोर आल्यानंतर संताप आणखी वाढला आहे. पहिल्याच गुन्ह्यानंतर कठोर कारवाई झाली असती, तर आज दुसऱ्या मुलाचा जीव गेला नसता, अशी प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, निष्काळजीपणाबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. दहिवडी ग्रामपंचायतीनेही या प्रकरणात पुढाकार घेत प्रशासनाला लेखी निवेदन देत आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. गावातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण असून, मुलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. अनेक कुटुंबांनी मुलांना एकटे बाहेर पाठवणे टाळण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, परिस्थिती तणावपूर्ण होत असल्याने पोलिसांनी गावात बंदोबस्त वाढवला आहे. आरोपीच्या कुटुंबीयांच्या सुरक्षेसाठीही विशेष खबरदारी घेतली जात आहे, कारण संतप्त जमावाचा रोष वाढण्याची शक्यता आहे. ग्रामस्थांचा संताप पाहता, या प्रकरणात जलदगतीने आणि कठोर निर्णय घेण्याची अपेक्षा आता अधिक तीव्र झाली आहे.

# मांडवगण फराटा गोळीबार प्रकरणातील दोन जण ताब्यात

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. २२ : मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील क्रिकेट स्पर्धेदरम्यान झालेल्या थरारक गोळीबार प्रकरणाची पोलिसांनी गंभीर दखल घेत कारवाईला वेग दिला असून, याप्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके तयार करून शनिवारी(ता.२१) दिवसभर व्यापक शोध मोहीम राबवण्यात आली.

गुरुवारी (ता. १९) सायंकाळच्या सुमारास क्रिकेट स्पर्धेच्या बॅनरवर फोटो न लावल्याच्या किरकोळ कारणावरून दोन गटांम ध्ये वाद निर्माण झाला.हा वाद क्षणातच तीव्र होत दोन्ही बाजूंनी गोळीबार करण्यात आला.या धक्कादायक घटनेत दोन जण जखमी झाले असून संपूर्ण गावात आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.




घटनेनंतर दोन्ही गटांकडून परस्परविरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या होत्या. मिथुन उर्फ अमोल आनंदा चौगुले (रा. मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि. पुणे) याच्या फिर्यादीनुसार सूत्रधार शिंदे, पप्पू कड, ऋतिक चव्हाण, योगेश मचाले, मिनीनाथ गव्हाणे, दिगंबर शेंडकर व अन्य ४ ते ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तर अक्षय गोविंदा पाटील (रा. तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे)याच्या फिर्यादीनुसार अमोल आनंदा चौगुले, राहुल सुदाम गिऱ्हे व संदीप तेलंग या तिघांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला होता. दरम्यान, पोलिसांनी तातडीने कारवाई करत मिथुन उर्फ अमोल आनंदा चौगुले, मिनीनाथ गव्हाणे व संदीप सुदाम गिरे यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.मात्र, शनिवारी (ता. २१) दिवसभर आणि रविवार (ता. २२) दुपारपर्यंत एकूण किती जणांना ताब्यात घेण्यात आले याबाबत अधिकृत माहिती मि ळू शकली नाही. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांनी घटनास्थळी भेट देत मांडवगण फराटा पोलीस चौकीतच तळ ठोकला.त्यांनी तपास पथकांना आवश्यक त्या सूचना देत आरोपींचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले. पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पाच वरिष्ठ अधिकारी व सुमारे ३० पोलीस कर्मचारी विविध पथकांमध्ये विभागून परिसरातील अनेक ठिकाणी छापेम ारी करण्यात आली. संशयितांचा माग काढण्यासाठी पोलिसांनी तांत्रिक तपासासह गुप्त माहितीच्या आधारे मोहीम तीव्र केली आहे. दरम्यान,या प्रकरणात वापरण्यात आलेले शस्त्र अद्याप जप्त करण्यात आले नसल्याची माहिती समोर आली असून,त्याचा शोध घेणे पोलिसा समोर मोठे आव्हान ठरत आहे. या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास शिरूर पोलीस करत असून,पुढील काही दिवसांत आणखी संशयितांना ताब्यात घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### प्रेमविवाहाचा राग मनात धरून तरुणाला नग्न करून मारहाण

**जळगाव, ता. २२ :** जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात प्रेमविवाह केल्याच्या कारणावरून एका २५ वर्षीय तरुणावर अमानुष अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात काही जणांनी तरुणाला बेदम मारहाण करत त्याची नग्न धिंड काढली तसेच त्याच्या पत्नीला जबरदस्तीने घेऊन गेल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खडका येथील चेतन दिलीप जंगले या तरुणाने १८ वर्षीय तरुणीसोबत प्रेमविवाह केला होता. हा त्याचा दुसरा विवाह होता. या विवाहामुळे मुलीच्या नातेवाईकांमध्ये संताप होता. शुक्रवारी २० मार्च रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता चेतन आपल्या पत्नीसह नातेवाईकांच्या घरी गेला असताना काही जणांनी तिथे येत वाद सुरू केला. सुरुवातीला धमक्या देण्यात आल्या आणि त्यानंतर चेतन व त्याच्या पत्नीवर मारहाण करण्यात आली.

## पिस्तूलमधून चुकून सुटलेली गोळी मुलाला लागली; तिघांना अटक



**पुणे, ता. २२ :** पुणे शहरातील मुंढवा परिसरातील केशवनगर येथे बेकायदेशीर पिस्तूल निष्काळजीपणे हाताळल्यामुळे गोळी सुटून एका अल्पवयीन मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. मित्रांमध्ये शस्त्र दाखवताना हा प्रकार घडला असून या प्रकरणात पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे, तर एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सक्षम युवराज गायकवाड (वय १९), ओम दुर्गा गायकवाड (वय १९) आणि सोनू मुंडे (वय २१) यांचा समावेश आहे. हे सर्वजण मुंढवा आणि आसपासच्या भागातील रहिवासी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपींची पूर्वीची गुन्हेगारी नोंदही असल्याचे समोर आले आहे.

ही घटना १८ मार्च रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास केशवनगरमधील गुरुकृपा सोसायटीजवळील मोकळ्या जागेत घडली. काही तरुण तिथे एकत्र आले होते आणि त्यापैकी एकाने आणलेले गावठी पिस्तूल ते एकमेकांना दाखवत होते. निष्काळजीपणे शस्त्र हाताळताना एकाने पिस्तूल परत घेतले आणि ते एका अल्पवयीन मुलावर रोखले. त्याने ट्रिगर दाबताच गोळी सुटली आणि ती मुलाच्या कमरेत लागली.

जखमी मुलाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून पोलिसांकडून अधिक माहिती गोळा करण्यात येत आहे.

दरम्यान, शहरात बेकायदेशीर शस्त्रांचा वापर वाढत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी कठोर कारवाईची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# एमआयटी एडीटी विद्यापीठ रायन समूहात शैक्षणिक सहकार्याचा करार

## विद्यार्थ्यांना नवोन्मेष, डिझाईन व तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची नवी दारे खुली

**पुणे, ता. २२ :** एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे आणि रायन आंतरराष्ट्रीय संस्था समूह यांच्यात शैक्षणिक सहकार्य, नवोन्मेषाधारित शिक्षण आणि विद्यार्थ्यांना अनुभवात्मक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. एमआयटी शैक्षणिक संकुलातील इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनच्या प्रा. एच. के. व्यास सभागृहात दोन्ही संस्थांच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा करार औपचारिकरीत्या संपन्न झाला.

या सहकार्याद्वारे शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण यांमध्ये शैक्षणिक दुवा निर्माण करण्यावर भर देण्यात येणार असून, डिझाईन थिंकिंग, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा प्रारंभिक शिक्षणात समावेश करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून कार्यशाळा, प्राध्यापकांचे मार्गदर्शन, शैक्षणिक भेटी तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठातील मेकर्स्पेस व इनोव्हेशन लॅब्ससारख्या आधुनिक सुविधा विद्यार्थ्यांसाठी खुल्या करण्यात येणार आहेत.




या कार्यक्रमास रायन इंटरनॅशनल ग्रुपतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद शर्मा, समूहाच्या शैक्षणिक बाबींच्या उपाध्यक्षा निधी थापर, उपाध्यक्ष तथा व्यवसाय प्रमुख जॉन अॅलेक्स उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठातर्फे प्र-कुलगुरू डॉ. नचिकेत ठाकूर, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दंडेश्वर बिसोयी, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांच्यासह इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनचे सर्व प्राध्यापक यावेळी उपस्थित होते.

रायन इंटरनॅशनल ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स ही देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था असून, देशातील २० राज्ये व ४० शहरांमध्ये १५० हून अधिक शाळांद्वारे सुमारे २.५ लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. शैक्षणिक गुणवत्ता, व्यक्तिमत्त्व विकास आणि क्रीडा, कला, नेतृत्व व सामाजिक सहभाग यांसारख्या सहशैक्षणिक उपक्रमांद्वारे सर्वांगीण शिक्षण देण्यासाठी ही संस्था ओळखली जाते.

यावेळी विनोद शर्मा म्हणाले, उत्कृष्ट शिक्षण हे केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांना व्यापक अनुभव देणे तितकेच महत्त्वाचे आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठासोबतचे हे सहकार्य विद्यार्थ्यांना डिझाईन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरेल. या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, याचा आम्हाला अभिमान आहे.

याप्रसंगी बोलताना डॉ. नचिकेत ठाकूर म्हणाले, विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सामंजस्य करारातून दोन्ही संस्थांची भविष्योन्मुख, सर्जनशील व कौशल्याधारित शिक्षण देण्याची सामायिक दृष्टी स्पष्ट होत असून, विद्यार्थ्यांना डिझाईन-आधारित समस्या निराकरण पद्धती आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा लवकर परिचय मिळणार आहे. बदलत्या जागतिक करिअर संधींसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दरम्यान, विश्वशांती प्रार्थनेने सुरू झालेल्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रन्शिल मल्होत्रा यांनी परिश्रम घेतले.

# व्यावसायिकांना दिलासा; केंद्र सरकारकडून कमर्शियल गॅस वाटपात २० टक्के वाढ

**पुणे, ता. २२ :** आंतरराष्ट्रीय पातळीवरील तणावपूर्ण परिस्थितीमुळे देशात एलपीजी गॅसच्या उपलब्धतेबाबत निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या वाटपात २० टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे हॉटेल, रेस्टॉरंट तसेच लहान-मोठ्या खाद्य व्यवसायांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गेल्या काही दिवसांत अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील तणावामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो, अशा चर्चांना उधाण आले होते. काही ठिकाणी एलपीजी सिलेंडरसाठी नागरिकांच्या रांगा



लागल्याच्या घटनाही समोर आल्या होत्या. मात्र, केंद्र सरकारने वारंवार स्पष्ट केले आहे की देशात गॅसचा साठा पुरेसा असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.

दरम्यान, घरगुती ग्राहकांना प्राधान्य देण्यासाठी व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर काही प्रमाणात निर्बंध घालण्यात आले होते. त्यामुळे विशेषतः लहान हॉटेल, ढाबे आणि कॅटरिंग व्यवसायावर मोठा परिणाम झाला होता. अनेक व्यावसायिकांना मर्यादित सिलेंडरवर काम भागवावे लागत होते.

ही परिस्थिती लक्षात घेऊन पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने राज्यांना दिल्या जाणाऱ्या व्यावसायिक एलपीजी कोट्यात २० टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रशासित प्रदेशांसाठी हा पुरवठा ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात येणार आहे. २३ मार्चपासून हा निर्णय देशभर लागू होणार आहे.

या निर्णयामुळे बाजारातील गॅस उपलब्धता सुधारण्यास मदत होईल आणि हॉटेल-रेस्टॉरंट उद्योगासह इतर व्यावसायिक क्षेत्रातील कामकाज पुन्हा सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या अनिश्चिततेमुळे चिंतेत असलेल्या व्यावसायिकांसाठी ही घोषणा दिलासादायक ठरत आहे.

## चाकण एमआयडीसीत दुचाकी चोरणाऱ्या नेपाळी भामट्याला अटक

**पुणे, ता. २२ :** पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली असताना, चाकण-महाळुंगे एमआयडीसी परिसरात पोलिसांनी महत्त्वाची कारवाई करत एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. या आरोपीकडून चोरीच्या ४ दुचाकी आणि घरफोडीतील मुद्देमाल असा एकूण सुमारे १.५ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेला आरोपी प्रकाश तेज विश्वकर्मा (वय २०) हा मूळचा नेपाळचा असून सध्या भोसरीतील चक्रपाणी वसाहतीत राहत होता. पोलिसांच्या तपासात तो यापूर्वीही गुन्हेगारीत सक्रिय असल्याचं समोर आलं. विशेष म्हणजे, त्याला येरवडा कारागृहातून ताब्यात घेऊन या गुन्ह्यांची उकल करण्यात आली.

महाळुंगे एमआयडीसी हा औद्योगिक पट्टा असल्याने येथे दररोज हजारो कामगार आणि वाहनांची वर्दळ असते. याच गर्दीचा फायदा घेत आरोपीने पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दुचाकींची निवड करून चोरी केली. मागील काही आठवड्यांत ३-४ तक्रारी आल्यानंतर पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीपर्यंत पोहोचण्यात यश आले.

चौकशीदरम्यान आरोपीने ४ दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. तसेच, एका घरफोडीचा गुन्हाही त्याने केल्याचं उघड झालं. या घरफोडीतून चोरलेलं सोन्याचं पदकही पोलिसांनी जप्त केलं आहे.

# पुणे महसूल विभागात भूकंप; सातबाऱ्यांत फेरफार प्रकरणी १५२ अधिकाऱ्यांवर कारवाईची तलवार

**पुणे, ता. २२ :** महाराष्ट्रात जमीन नोंदींमध्ये फेरफार केल्याच्या गंभीर प्रकरणात आता प्रशासनाने कडक भूमिका घेतली असून, महसूल विभागातील गैरव्यवहार उघडकीस येऊ लागले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीच्या नोंदी बदलल्याचे समोर आल्यानंतर सरकारने चौकशीचा वेग वाढवला आहे.

या प्रकरणात दोषी आढळलेल्या पुण्याच्या तब्बल १५२ महसूल अधिकाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. मंत्रालय स्तरावर या अधिकाऱ्यांची यादी तयार करण्यात येत असून, लवकरच त्यांच्यावर निलंबन, बदली आणि विभागीय चौकशीची कारवाई होणार आहे. विशेष म्हणजे




या यादीत तत्कालीन तहसीलदार, नायब तहसीलदार आणि मंडळ अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याने प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट होते.

चौकशीत या अधिकाऱ्यांनी अधिकाराच्या मर्यादेबाहेर जाऊन मालकी हक्क, वारस नोंदी आणि जमिनीचे क्षेत्रफळ बदलण्यासारख्या महत्त्वाच्या नोंदींमध्ये फेरफार केल्याचे निष्पन्न झाले आहे. यामुळे जमीन व्यवहारांमध्ये गोंधळ निर्माण होऊन अनेक नागरिकांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन राज्य सरकारने नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती नेमली होती. या समितीने गेल्या ५ वर्षांतील प्रकरणांचा सखोल अभ्यास करून अहवाल सादर केला आहे. अहवालानुसार, १५२ अधिकाऱ्यांपैकी १५ जणांवर अतिगंभीर, ८२ जणांवर गंभीर आणि ५५ जणांवर मध्यम स्वरूपाच्या अनियमिततेचे आरोप आहेत. या प्रकरणात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचाही समावेश असण्याची शक्यता असून, त्यामुळे चौकशीचा विस्तार आणखी वाढू शकतो. जमीन नोंदींशी संबंधित पारदर्शकता आणि विश्वासार्हता यावर या घडामोडींचा थेट परिणाम होणार असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## सिद्धीविनायक मंदिरातील दानपेटीतून कर्मचाऱ्यानेच उचलले पैसे

**मुंबई, ता. २२ :** देशभरातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या प्रभादेवी येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात चोरीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मंदिरातीलच एका कर्मचाऱ्याने दानपेटीतून पैसे चोरल्याची बाब समोर आल्यानंतर भाविकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी दादर पोलिसांनी आरोपीला अटक करून तपास सुरू केला आहे.

राजेंद्र पेंडुरकर (वय ५७) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो मंदिरात काम करत होता. मंदिर प्रशासनाने नियमित तपासणीदरम्यान सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता, पेंडुरकर दानपेटीतून पैसे काढताना दिसून आला. त्यानंतर मंदिर ट्रस्टने तात्काळ दादर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# निगडीतील अपघातात पोलीस उपनिरीक्षकाचा जागीच मृत्यू

**पिंपरी चिंचवड, ता. २२ :** पिंपरी चिंचवड शहरातील निगडी परिसरात शुक्रवारी सायंकाळी झालेल्या अपघातात एका ५९ वर्षीय पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू झाला. भरधाव वेगाने आलेल्या कारने मागून धडक दिल्याने हा दुर्दैवी प्रकार घडला. गंभीर दुखापतींमुळे संबंधित अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.




ही घटना सायंकाळी सुमारे ६.४५ वाजण्याच्या सुमारास चिखली येथील थमक्स चौक ते आकुर्डीतील खंडोबा माळ या रस्त्यावर घडली. मृत अधिकाऱ्याची ओळख रामखिलवान यादव (वय ५९, रा. चिखली) अशी झाली आहे. ते पायी जात असताना मागून वेगात येणाऱ्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की त्यांच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली.

या अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, वैद्यकीय तपासणीदरम्यान यादव यांना मृत घोषित करण्यात आले.

या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ दिवाटे यांनी दिलेल्या माहितीनुसार कार चालकाला अटक करण्यात आली आहे. आरोपीची ओळख संजय रमेश जिंदाल (वय ५६, रा. निगडी प्राधिकरण) अशी झाली आहे.

तो MH १४ KN ६८२५ या क्रमांकाची कार भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत असल्याचे तपासात समोर आले आहे.

या घटनेमुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवर वाढलेल्या बेदरकार वाहनचालकांबाबत चिंता व्यक्त होत आहे. विशेषतः सायंकाळच्या गर्दीच्या वेळी अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## दौंड–मिरज मार्गासह महत्त्वाच्या रेषांवर दुहेरीकरण

**पुणे, ता. २२ :** पुणे रेल्वे विभागाने पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणात महत्त्वाची झेप घेतली असून, याचा थेट फायदा प्रवासी आणि उद्योग क्षेत्राला होणार आहे. विभागातील एकूण ९२५ किमी लोहमार्गपैकी तब्बल ५८८ किमी मार्गाचे दुहेरीकरण पूर्ण झाल्याने रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत आणि वेगवान होण्याची अपेक्षा आहे.



पुणे विभाग हा मध्य रेल्वेचा अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जातो. पुणे, दौंड, मिरज, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि शिर्डी यांसारख्या प्रमुख शहरांना जोडणाऱ्या या मार्गांवर दररोज हजारो प्रवासी आणि मोठ्या प्रमाणात मालवाहतूक होते. मात्र, यापूर्वी अनेक मार्ग एकेरी असल्याने गाड्यांना क्रॉसिंगसाठी १ ते २ तास थांबावे लागत असे. त्यामुळे वेळेचा अपव्यय आणि उशीर हा कायमचा प्रश्न बनला होता. दुहेरीकरणामुळे ही अडचण मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. आता गाड्यांना समोरून येणाऱ्या गाडीची वाट पाहण्याची गरज राहणार नाही, त्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. विशेषतः पुणे-मिरज आणि दौंड-मनमाड या व्यस्त मार्गांवरील काम पूर्णत्वाकडे गेल्याने गाड्यांचा सरासरी वेग वाढणार आहे.

याचा सर्वात मोठा फायदा उद्योग आणि शेती क्षेत्राला होणार आहे. मालगाड्यांची वाहतूक जलद झाल्याने उत्पादन बाजारात वेळेत पोहोचेल, ज्यामुळे व्यापाऱ्यांना १-२ दिवसांची बचत होऊ शकते. यामुळे लॉजिस्टिक खर्चही कमी होण्याची शक्यता आहे.

सध्या काही मार्गांवर काम सुरूच आहे. अहिल्यानगर-बीड आणि लोणंद-फलटण हे मार्ग अद्याप एकेरी असले तरी त्यांचे दुहेरीकरणही युद्धपातळीवर सुरू आहे. वाढती लोकसंख्या आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेता, पुढील २-३ वर्षांत संपूर्ण विभाग अधिक सक्षम करण्याचा रेल्वेचा प्रयत्न आहे.

# खरात प्रकरणाचा मास्टरमाइंड कोण?; सगळा कच्चा चिट्ठा माझ्या हाती : मुख्यमंत्री

**नाशिक, ता. २२ :** नाशिकमधील ज्योतिष अशोक खरात याने अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे प्रकरण सध्या संपूर्ण राज्यात गाजत आहे. या प्रकरणावरून राजकीय वातावरणही चांगलेच तापले असून, आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर आपली सविस्तर भूमिका मांडली आहे. खरातने १५० पेक्षा जास्त महिलांचे शोषण केल्याचा आरोप असून, पोलिसांच्या हाती ५८ व्हिडिओ लागले आहेत. या गंभीर प्रकरणाची दखल घेत महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा



राजीनामा दिला आहे.

या प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, खरात प्रकरण अत्यंत गंभीर असून सरकारनेच याचा भांडाफोड केला आहे. अनेकदा सामाजिक दबावामुळे पीडित महिला पुढे येत नाहीत, परंतु आम्ही त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला धीर देऊन समोर येण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी सुरू असून मी स्वतः पोलीस महासंचालकांना यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या गुन्ह्यात कोणाचीही गय केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

काही लोक या प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. ते म्हणाले की, या प्रकरणाचे सर्वात जास्त पुरावे माझ्याकडे आहेत. केवळ एखाद्या व्यक्तीला भेटले म्हणून कोणावर कारवाई करणे चुकीचे आहे. जर कोणाचे नाव विनाकारण ओढले जात असेल तर ते योग्य नाही. उद्धव ठाकरे यांच्या काळात खरातच्या फार्म हाऊसला पाणी दिले गेले, यावर विचारले असता त्यांनी सांगितले की, त्या गोष्टींची चौकशी करायची की नाही ते नंतर पाहू, पण सध्या महिलांवर झालेल्या अत्याचाराची चौकशी करणे ही आमची पहिली प्राथमिकता आहे.

अशोक खरात याचे काही बड्या अधिकाऱ्यांशी संबंध होते आणि त्यातून त्याने मोठी संपत्ती तसेच जमिनी जमा केल्याचे आरोप होत आहेत. यावर भाष्य करताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, खरातच्या सर्व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी केली जाईल. आम्हाला राजकारण करण्यात रस नसून महिलांचा आत्मसन्मान जपण्याला आमचे प्राधान्य आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून पीडितांना न्याय मिळवून दिला जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

# दौंड येथील सराईत गुन्हेगार महेश चोरमले तडीपार

**दौंड, ता. २२ :** दौंड परिसरात दहशत निर्माण करून वारंवार गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अखेर पोलिसांनी तडीपार करून मोठी कारवाई केली आहे. आरोपी महेश रमेश चोरमले (रा. गोपाळवाडी, ता. दौंड, जि. पुणे) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. चोरमले याला पुढील एक वर्षासाठी पुणे, सोलापूर, सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यांच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आल्याचे आदेश दौंड उपविभागीय दंडाधिकारी यांनी दिले आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरमले याच्याविरुद्ध खूनाचा प्रयत्न, महिलेला छेडछाड, धमक्या, जबरी, घरफोडी आणि चोरी यांसारख्या गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे विविध कालावधीत नोंद झाले होते. त्याच्या गुन्हेगारी हालचालीं मुळे दौंड परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते आणि कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते.

या पार्श्वभूमीवर दौंड पोलिस ठाण्याने महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अंतर्गत तडीपार प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात पाठविला होता. सुनावणीनंतर न्यायालयाने प्रस्ताव मान्य करत आरोपीला पुणे आयुक्तालय व महानगरपालिका हद्दीसह चार जिल्ह्यांतून एक वर्षासाठी तडीपार करण्याचा आदेश दिला. या कारवाईमुळे गोपाळवाडी व दौंड शहर परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे. तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्यास आरोपीविरुद्ध अधिक कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

दरम्यान, अशाच प्रकारे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या इतर आरोपींवरही तडीपारसारख्या प्रतिबंधात्मक कारवाया सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली आहे.

# अशोक खरातच्या दरबारात नक्की काय चालायचं? संजय राऊतांचा गौप्यस्फोट

**नाशिक, ता. २२ :** महाराष्ट्रात सध्या अंधश्रद्धा आणि महिलांच्या शोषणाचे गंभीर केंद्र बनलेल्या भोंदूबाबा अशोक खरात ऊर्फ कॅप्टन याच्या प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले आहे. अध्यात्माच्या नावाखाली महिलांवर अत्याचार करणाऱ्या या भोंदूबाबाचे आता अनेक बड्या राजकीय नेत्यांशी असलेले संबंध उघड झाले आहेत. या प्रकरणामुळे राज्यातील राजकारण चांगलेच तापले असून, दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे.

विशेष म्हणजे, शिवसेना नेते संजय राऊत यांनी या प्रकरणात अत्यंत खळबळजनक आरोप केले आहेत. सध्याच्या मंत्रिमंडळातील ९ मंत्री हे या भोंदूबाबाचे भक्त होते आणि ते त्याच्या सांगण्यावरून घृणास्पद अघोरी विधी करायचे, असा दावा राऊत यांनी केला आहे. या आरोपामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. इतकेच नाही तर, अशोक खरात याचे विविध पक्षांतील दिग्गज नेत्यांसोबतचे फोटो आता समाजमाध्यमांवर वेगाने व्हायरल होत आहेत. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार निलेश लंके, आमदार दीपक केसरकर, आमदार जयंत पाटील आणि मिलिंद नार्वेकर यांसारख्या मोठ्या नेत्यांचा समावेश असल्याचे दिसून येत आहे.



अशोक खरात याने या बड्या नेत्यांच्या नावाचा आणि पदाचा गैरवापर करून कोट्यवधी रुपयांची संपत्ती जमा केल्याचा आरोपही आता केला जात आहे. महिलांचे शोषण करण्यासाठी अध्यात्माचा मुखवटा वापरणाऱ्या या भोंदूबाबाला नक्की कोणाचे अभय होते, असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेकडून विचारला जात आहे. मंत्रिमंडळातील ते ९ मंत्री नक्की कोण आहेत आणि त्यांनी खरंच असे अघोरी विधी केले आहेत का, याचा शोध घेणे आता पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

दरम्यान, राजकीय नेत्यांचे असे अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे वर्तन राज्याला कोणत्या दिशेला घेऊन जात आहे, अशी भीती व्यक्त केली जात आहे. आता गृहखाते या प्रकरणाची सखोल चौकशी करून 'कॅप्टन फाईल्स'मधील त्या मंत्र्यांची नावे जनतेसमोर आणणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जुन्नरमध्ये कांद्याचे दर कोसळले; बळीराजा पुन्हा एकदा आर्थिक संकटात

**पुणे, ता. २२ :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका कांद्याचे आगर म्हणून ओळखला जातो. मात्र सध्या या भागातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. एकेकाळी चांगला नफा देणारा उन्हाळी कांदा यंदा तोट्याचा ठरत आहे. ओतूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला सध्या प्रतिकिलो फक्त ९ ते १२ रुपये इतकाच दर मिळत आहे. या दरात उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी हताश झाले आहेत.




यंदा हवामान अनुकूल असल्याने कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले. पण बाजारात मोठी आवक झाल्यामुळे दर घसरले आहेत. ओतूर, रोहोकडी, आंबेगव्हाण, पाचघर, आहिनवेवाडी, उदापूर, डिंगोरे, उंब्रज, खामुंडी, डुंबरवाडी, धोलवड आणि नेतवड या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात कांदा पिकवला जातो. या भागातील कांद्याला देशांतर्गत तसेच बेंगळुरु, गुजरात, कर्नाटक, दिल्ली आणि आखाती देशांमध्ये मागणी असते.

मात्र यंदा मध्यप्रदेश, राजस्थान आणि गुजरात या राज्यांतही कांद्याचे उत्पादन वाढले आहे. त्यामुळे स्पर्धा वाढली असून दरावर दबाव आला आहे. त्यातच निर्यातीसंदर्भातील धोरणे वारंवार बदलल्याने निर्यात जवळपास थांबली आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे वाहतूक खर्च वाढला आहे. गॅस तुटवड्याचाही परिणाम दिसत आहे. त्यामुळे भारतीय कांदा परदेशात महाग पडत असून स्थानिक बाजारात साठा वाढत आहे.

दरम्यान, बियाणे, खते, औषधे आणि मजुरी यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. एका एकरासाठी सुमारे ८०००० ते १ लाख रुपये खर्च येत आहे. सध्याच्या दरात हा खर्च वसूल होणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले असून शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# भोंदूबाबा खरात आणि ऑफिस बॉय नीरज जाधवमध्ये एसआयटीसमोर जुंपली

**नाशिक, ता. २२ :** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाचा तपास दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असून, विशेष तपास पथकाकडून या प्रकरणातील विविध पैलूंवर सखोल चौकशी सुरू आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे आधीच चर्चेत असलेल्या या प्रकरणात आता आर्थिक व्यवहार, मालमत्ता आणि संपर्क जाळ्याचीही छाननी केली जात आहे. आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील पथकाने खरातची तब्बल ७ तास सखोल चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे.



या चौकशीत तांत्रिक पुरावे, आर्थिक व्यवहारांची साखळी आणि मालमत्तेची माहिती गोळा करण्यावर भर दिला जात आहे. खरातचे जबाब नोंदवले जात असून, त्याच्या कथित नेटवर्कचा विस्तार किती आहे याचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणामुळे राजकीय पातळीवरही मोठी खळबळ उडाली असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

खरातसोबतचे फोटो आणि त्याच्या संस्थेशी असलेला संबंध यामुळे चाकणकरांवर विरोधकांकडून टीका होत आहे. त्यांना सहआरोपी करण्याची मागणीही काही महिला नेत्यांकडून पुढे येत आहे. या सर्व घडामोडींमुळे प्रकरणाचा राजकीय आणि सामाजिक प्रभाव अधिक वाढला आहे.

दरम्यान, चौकशीदरम्यान एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे खरात आणि त्याच्या कार्यालयातील कर्मचारी नीरज जाधव यांची समोरासमोर चौकशी करण्यात आली. या वेळी दोघांमध्ये शाब्दिक वाद झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. नीरज जाधव हा या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा मानला जात असून, त्याच्या माध्यमातून अनेक पुरावे समोर येण्याची शक्यता आहे.


सध्या खरात पोलीस कोठडीत असून त्याच्याकडून अधिक माहिती मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचे राजकीय संबंध, आर्थिक व्यवहार आणि संभाव्य सहकारी यांचा तपास सुरू असल्याने पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राइम लाइफ



## उन्हाळ्याचा डाएट प्लॅन! या गोष्टींकडे करू नका दुर्लक्ष

राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार गेला आहे. कडक उन्हामुळे केवळ घामच येत नाही, तर शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन थकवा, चक्कर येणे आणि उष्माघाताचा धोका वाढतो. अशा वेळी औषधांपेक्षा आहार हेच मोठे संरक्षण कवच ठरू शकते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात आपण काय खातो यापेक्षा काय टाळतो, याला जास्त महत्त्व आहे. केवळ तहान लागल्यावर पाणी पिणे ही मोठी चूक आहे. उन्हाळ्यात शरीराला सतत हायड्रेशनची गरज असते.

लिंबू सरबत आणि पन्हे : केवळ साधे पाणी न पिता त्यात लिंबू, मीठ आणि थोडी साखर घालून प्यावे, जेणेकरून शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स टिकून राहतील.

नारळ पाणी: हे नैसर्गिकरित्या शरीरातील उष्णता शोषून घेते.

पालेभाज्या आणि फळांचा राजा कलिंगड

उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावते, त्यामुळे जड अन्न खाणे टाळावे.

पाणीदार फळे : कलिंगड, टरबूज, संत्री आणि द्राक्षे यामध्ये ९०% पेक्षा जास्त पाणी असते. ही फळे नैसर्गिक थंडावा देतात.

काकडी : रोजच्या जेवणात काकडीचा समावेश हमखास करावा. काकडी शरीर हायड्रेटेड ठेवण्यासोबतच त्वचाही टवटवीत ठेवते.

दही आणि ताक

जेवणात दह्याची कोशिंबीर किंवा जेवणानंतर एक ग्लास ताक म्हणजे उन्हाळ्यातील अमृतच. ताकामध्ये प्रोबायोटिक्स असतात, जे पचन सुधारतात आणि शरीरातील अतिरिक्त उष्णता बाहेर काढण्यास मदत करतात.

हे पदार्थ तातडीने टाळा!

तळलेले आणि मसालेदार पदार्थ : जास्त तेलकट आणि तिखट पदार्थ खाल्ल्याने शरीरातील उष्णता वाढते आणि पित्ताचा त्रास होतो.

चहा आणि कॉफी : कॅफीनमुळे लघवीला जास्त वेळ जावं लागत, ज्यामुळे शरीर लवकर डिहायड्रेट होते. त्याऐवजी थंड दूध किंवा आमसूल सरबत उत्तम.

मांसाहार कमी करा : उन्हाळ्यात मांस पचायला जड जाते आणि त्यामुळे शरीराचे तापमान वाढू शकते.

दरम्यान, हे सोपे आणि महत्वाचे बदल तुम्ही केल्यास तुम्ही उन्हाळ्यातही निरोगी रहाल. उष्माघाताचा त्रास होत असल्यास डॉक्टरांना दाखवावे. घरीच उपचार करू नये.

# भोंदूबाबा प्रकरण अजितदादांना माहिती होतं; तो चाकणकरांचा शुगर डॅडी : रुपाली ठोंबर

**पुणे, ता. २२ :** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्व भूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत संघर्ष उघडपणे समोर येत असून, पक्षातील नेत्या रुपाली ठोंबरे यांनी रुपाली चाकणकर यांच्यावर अत्यंत तीव्र आणि थेट आरोप केले आहेत. चाकणकर यांच्या राजीनाम्यानंतरही हा वाद शांत न होता अधिकच चिघळताना दिसत आहे.



रुपाली ठोंबरे यांनी आरोप केला की, या प्रकरणातील अनेक कडू सत्य दिवंगत अजित पवार यांना आधीच माहित होते आणि त्यांनी चाकणकर यांचा राजीनामा मागितला होता. मात्र तो निर्णय थांबवण्यात आला, असा दावा त्यांनी केला. अजित दादा आज असते, तर त्यांनी अशा प्रकारांना कडक पद्धतीने आवर घातला असता, असे वक्तव्य करत त्यांनी पक्षातील नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका केली.

ठोंबरे यांनी पुढे इशारा देत सांगितले की, अजित पवार यांच्या शेवटच्या काळात त्यांच्याभोवती कोण होते आणि कोणत्या कारणां मुळे ते अस्वस्थ होते, याचा खुलासा त्या पुढील काळात नावानिशी करणार आहेत. या सर्व प्रकरणासाठी त्यांनी थेट रुपाली चाकणकर यांनाच जबाबदार धरले आहे.

चाकणकर यांच्या राजीनाम्याच्या वेळी समोर आलेल्या छायाचित्रावरूनही ठोंबरे यांनी टीका केली. त्यांनी म्हटले की, अशा संवेदनशील प्रकरणात अपेक्षित गांभीर्य दिसून आले नाही. तसेच वैयक्तिक कारणांमुळे राजीनामा हा दावा त्यांनी फेटाळत, तो केवळ दिखावा असल्याचे म्हटले.

याशिवाय, चाकणकर या नियमितपणे नाशिकमध्ये खरात याच्या संपर्कात होत्या आणि त्यांनी इतर नेत्यांचीही त्याच्याशी ओळख करून दिली, असा आरोप ठोंबरे यांनी केला. सार्वजनिक पदावर असलेल्या व्यक्तींनी जबाबदारीने वागणे अपेक्षित असताना तसे झाले नाही, असे त्यांनी नमूद केले.

या सर्व घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये केवळ राजकीय नव्हे तर नैतिक आणि नेतृत्वाच्या प्रश्नांवरही मोठी चर्चा सुरू झाली आहे. पुढील काळात या आरोप-प्रत्यारोपांमुळे पक्षांतर्गत समीकरणांवर काय परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## कमल वारघडे यांचे निधन

**बकोरी, ता. २२ :** बकोरी (ता. हवेली) येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तसेच दत्त कृपा विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या माजी संस्थापक अध्यक्षा कमल गोविंद वारघडे यांचे रविवारी (ता.२२) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्याच्या पश्चात मुलगा, मुलगी, नातवंडे व सुना असा परिवार आहे. माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे यांच्या त्या मातोश्री होत.

## चाकणकरांनीच भोंदूबाबाला वाचवलं!; रुपाली ठोंबरेंचे मुख्यमंत्र्यांना खळबळजनक पत्र

**पुणे, ता. २२ :** नाशिक मधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने आता राजकीय वर्तुळातही मोठा वाद निर्माण केला आहे. या प्रकरणातील आरोप-प्रत्यारोपांमुळे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातील नेत्या रुपाली ठोंबरे पाटील आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यातील संघर्ष उघडपणे समोर आला आहे. ठोंबरे पाटील यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहित गंभीर आरोप केले असून, या प्रकरणाला नवं वळण मिळालं आहे.



ठोंबरे पाटील यांनी आपल्या पत्रात दावा केला आहे की, भोंदूबाबा अशोक खरात याच्याकडून झालेल्या कथित अत्याचारांमागे चाकणकर यांचा अप्रत्यक्ष पाठिंबा होता. त्यांनी असा आरोपही केला की, चाकणकर यांनी पोलिसांवर दबाव टाकून खरातला वाचवण्याचा प्रयत्न केला. इतकंच नव्हे, तर या प्रकरणात मोठ्या स्तरावर गैरप्रकार घडल्याचा दावा करत त्यांनी आणखी माहिती प्रत्यक्ष भेटीत देण्याची तयारी दर्शवली आहे.

या पत्रात काही ठळक मुद्देही मांडण्यात आले आहेत. ठोंबरे पाटील यांच्या म्हणण्यानुसार, १ वर्षापूर्वी एका पत्रकाराने खरातच्या गैरकृत्यांवर प्रकाश टाकल्यानंतर त्याला धमकावून माफीनामा घेतला गेला. तसेच २९ डिसेंबर २०२५ रोजी दाखल झालेल्या एका गुन्ह्यामागेही दबाव टाकण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या सर्व घटनांमुळे खरातला दीर्घकाळ संरक्षण मिळालं, असा त्यांचा दावा आहे.

एका बाजूला महिलांच्या सुरक्षिततेसाठी काम करणाऱ्या संस्थेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे, तर दुसऱ्या बाजूला राजकीय आरोपांमुळे सत्य काय आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणं अत्यंत गरजेचं ठरतं. आता या प्रकरणात पुढे काय घडतं, तपास कोणत्या दिशेने जातो आणि सत्य काय समोर येतं याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

## कोथरूडच्या ज्येष्ठ नागरिकाची ३ लाखांची फसवणूक

**पुणे, ता. २२ :** पुण्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहेत. कोथरूड परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. ८१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला इलेक्ट्रिक शेगडी खरेदीच्या आमिषाने तब्बल ३ लाख १० हजार रुपयांना गंडा घालण्यात आला आहे. सोशल मीडियावर आकर्षक दरात इलेक्ट्रिक बर्नरची जाहिरात पाहून या नागरिकाने दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला. सध्या गॅस टंचाईची समस्या जाणवत असल्याने पर्याय म्हणून ही शेगडी उपयोगी ठरेल, असा त्यांचा विचार होता. याच मानसिकतेचा फायदा सायबर गुन्हेगारांनी घेतला.

फोनवरील संभाषणात गुन्हेगारांनी स्वतःला विक्रेते म्हणून विश्वासार्ह भासवलं. ऑफर मर्यादित आहे आणि ताबडतोब पेमेंट करा अशा दबावाच्या तंत्रांचा वापर करत त्यांनी ऑनलाइन पैसे भरण्याची प्रक्रिया सुरू केली. याच दरम्यान त्यांनी अत्यंत चलाखीने बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती जसे की ओटीपी, कार्ड तपशील मिळवली. काही मिनिटांतच खात्यातून ३,१०,००० रुपये दुसऱ्या खात्यात वळवले गेले. व्यवहाराचा मेसेज आल्यानंतरच फसवणूक झाल्याचं लक्षात आलं.

या प्रकरणानंतर पीडित ज्येष्ठ नागरिकाने तातडीने कोथरूड पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला प्रकार अधिकाऱ्यांना सांगितला. प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, व्यवहारांची साखळी आणि पैसे कोणत्या खात्यात वळवले गेले याचा मागोवा घेतला जात आहे.



## उरवडे परिसरात अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

**पुणे, ता. २२ :** मुळशी तालुक्यातील उरवडे परिसरात अवैध जुगार अड्ड्यांवर पुणे ग्रामीण पोलिसांनी केलेल्या कारवाईने खळबळ उडाली आहे. उरवडे ते मुकाईवाडी रस्त्यावरील एका बंगल्याच्या पत्रा शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकत पोलिसांनी ३० जणांना ताब्यात घेतलं. या कारवाईत सुमारे ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई केवळ एका अड्ड्यापुरती मर्यादित नाही, तर मुळशी परिसरात वाढत चाललेल्या जुगाराच्या जाळ्याची तीव्रता दर्शवणारी आहे. गोपनीय माहितीनंतर पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकला. एस.पी.एफ. व्येंकीज कंपनीलगत असलेल्या लाल रंगाच्या बंगल्यात मोठ्या प्रमाणावर पत्त्यांचा जुगार सुरू असल्याचं समोर आलं. छाप्यात पत्त्यांचे संच, रोकड आणि इतर साहित्य हस्तगत करण्यात आलं.

या अड्ड्यावर पकडले गेलेले लोक केवळ स्थानिक नव्हते. पिंपरी-चिंचवड, कोथरूड, वारजे, हडपसर, पाषाण यांसारख्या शहरातील विविध भागांतून लोक येथे खेळण्यासाठी येत असल्याचं स्पष्ट झालं. विशेष म्हणजे, या गटात १-२ नव्हे तर अनेक व्यावसायिक आणि नोकरदार वर्गातील व्यक्तींचा समावेश असल्याने हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे. या प्रकरणात क्लबचालकासह सर्व ३० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या ८ दिवसांत मुळशीत ही दुसरी मोठी कारवाई आहे. यापूर्वी मुगावडे-चाले मार्गावरील निवांत व्हिला येथे पोलिसांनी ४० जणांना पकडलं होतं.

## कदमवाकवस्ती येथे शेतकऱ्याला दुचाकीने ठोकरून तिघे फरार

**लोणी काळभोर, ता. २२ :** शेतात फेरफटका मारत असताना संशयास्पद हालचाल करणाऱ्या तरुणांना जाब विचारल्यामुळे एका शेतकऱ्याला ॲक्टीवा दुचाकीने धडक देऊन गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील कवडी माळवाडी परिसरात शनिवारी (ता. २१) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी तीन अज्ञात तरुणांविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

चंद्रशेखर सुधाकर हेमगुडे (वय ५९, रा. रेल्वेचाळीसमोर, कवडीमाळवाडी, कदमवाकवस्ती, ता. हवेली) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. तर शिंदे नावाचा तरुण आणि त्याचे दोन साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रशेखर हेमगुडे हे २१ मार्च रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास आपल्या शेताची पाहणी करण्यासाठी गेले होते. शेतातील बंद असलेल्या विहिरीजवळ ते पोहोचले असता, तेथे आरोपी शिंदे आणि त्याचे दोन साथीदार ॲक्टीवा दुचाकीसह संशयास्पदरीत्या थांबलेले दिसले. हेमगुडे यांनी त्यांना येथे काय करत आहात? अशी विचारणा केली व दुचाकीची चावी मागितली. तसेच तुमच्या वडिलांना घेऊन या आणि दुचाकी घेऊन जा, असेही त्यांनी सांगितले. यानंतर तिघांनी पुन्हा येथे येणार नाही, असे सांगत तेथून निघून जाण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, हेमगुडे यांनी दुचाकी थांबवण्याचा प्रयत्न करत पाठीमागून पकडले असता, तरुणांनी दुचाकी वेगात चालवत त्यांना धडक दिली. धक्का बसल्याने हेमगुडे खाली पडले आणि त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने हडपसर येथील सह्याद्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना हेमगुडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार शिंदे आणि त्याचे दोन अज्ञात साथीदार यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११५ (१), १२५, १२५ (ब) व ३ (५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राणी खामकर करत आहेत. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून आरोपींचा लवकरात लवकर शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## इंदापूरमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. २२ : इंदापूर शहर व तालुक्यात रमजान ईदचा पवित्र सण शनिवारी (ता. २१) उत्साहपूर्ण आणि एकोप्याच्या वातावरणात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच विविध ईदगाह मैदानांवर मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी उसळली होती. हजारो नागरिकांनी एकत्र येत नमाज अदा केली आणि ईद मुबारकच्या शुभेच्छा देत बंधुभावाची भावना दृढ केली.



याप्रसंगी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, नगराध्यक्ष भरत शहा, उपनगराध्यक्ष बाळासाहेब ढवळे, नगरसेवक अक्षय सूर्यवंशी, शुभम पवार, शकील सय्यद यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. सर्वांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देत सामाजिक ऐक्य जपण्याचे आवाहन केले.

नमाजानंतर दर्गाह मस्जिद चौक परिसरात एचकेजीएन ग्रुप व बागवान जमात यांच्या वतीने शीरखुर्मा वाटप करण्यात आले. तसेच अलतक्का बॉईज, राजेवली नगर आणि अहमद रजा सोशल फाउंडेशन यांच्या उपक्रमांमुळे सणाचा आनंद द्विगुणित झाला. विविध धर्मीय नागरिकांनी सहभागी होत एकतेचे सुंदर उदाहरण घडवले. यावेळी दत्तात्रय भरणे यांनी ईद हा सण समता, शांतता आणि बंधुभाव वाढवणारा असल्याचे सांगितले. हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर तालुक्याची सर्वधर्म समभावाची परंपरा अधोरेखित करत ती जपण्याचे आवाहन केले. नगराध्यक्ष भरत शहा यांनीही शुभेच्छा देत सण सौहार्दाने साजरा करण्याचे आवाहन केले. दरम्यान, इंदापूरसह बावडा, लुमेवाडी, निमगाव केतकी येथील ईदगाह मैदानांवरही नमाज शांततेत पार पडले. सर्वत्र आनंद आणि समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. ईदच्या या पावन सणाने तालुक्यातील एकात्मतेची परंपरा पुन्हा अधोरेखित झाली.

## रुपाली चाकणकरांच्या प्रदेशाध्यक्ष पदावर टांगती तलवार

**नाशिक, ता. २२ :** नाशिक मधील अशोक खरात प्रकरणानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठ्या राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. महिला अत्याचाराच्या आरोपांमुळे खरातला अटक झाल्यानंतर त्याच्यासोबतचे फोटो समोर आल्याने राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर प्रचंड दबाव निर्माण झाला आणि अखेर त्यांना त्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. मात्र आता प्रश्न त्यांच्या पक्षातील महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा आहे.



विरोधकांनी चाकणकर यांना त्या पदावरूनही हटवण्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसची उच्चस्तरीय बैठक सुरू आहे. या बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल सहभागी झाले असून, चाकणकर यांच्या भवितव्याबाबत महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे.

राजकीय दृष्ट्या ही बैठक अत्यंत संवेदनशील मानली जात आहे. चाकणकर यांनी महिला आयोगाचा राजीनामा दिला असला तरी पक्षातील पद कायम ठेवायचे की त्यातूनही त्यांना बाजूला करायचे, यावर चर्चा होणार आहे. पक्षाची प्रतिमा, आगामी राजकीय समीकरणे आणि विरोधकांचा दबाव या सर्व बाबी लक्षात घेऊन निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की, अशा निर्णयांबाबत अंतिम अधिकार पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे आहे. पूर्ण चौकशी करूनच निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणा मुळे केवळ एका व्यक्तीचा राजीनामा हा मुद्दा राहिलेला नसून, पक्षाच्या प्रतिमेचा आणि नैतिक भूमिकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत घेतला जाणारा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेससाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

# कडक फुलचंदच्या नावाखाली ड्रग्जचा खेळ; साडे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

### पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील पान टपऱ्यांवर पोलिसांचे छापे

**पुणे, ता. २२ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात लोकप्रिय असलेल्या पानाच्या नावाखाली धोकादायक अंमली पदार्थांची विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार पोलिसांच्या कारवाईत उघडकीस आला आहे. कडक फुलचंद या नावाने विकल्या जाणाऱ्या पानामध्ये पांढऱ्या पावडरच्या स्वरूपात घातक ड्रग्ज मिसळून ग्राहकांना दिले जात असल्याचे समोर आले असून, यामुळे शहरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.




लोणी काळभोर, हिंजवडी आणि चिंचवड या तीन ठिकाणी अंमली पदार्थ विरोधी पथकाने एकाचवेळी छापे टाकून या रॅकेटचा पर्दाफाश केला. लोणी काळभोर येथील मैफिल पान हाऊ समध्ये मिळणाऱ्या पावडरमध्ये अँफेटामाइन, बेंझोडायझेपाइन्स, ओपिएट्स आणि मेथॅम्फेटामाइनसारखी मेंदूवर गंभीर परिणाम करणारी द्रव्ये आढळली. या प्रकरणी कैलास मांढरे आणि अनुराधा मांढरे या दांपत्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

तपास पुढे नेत पोलिसांनी हिंजवडीजवळील जांबेगाव येथे चैतन्य फुड गोडाऊनवर छापा टाकला असता, येथेच या नशिल्या पावडरचे उत्पादन होत असल्याचे उघड झाले. या ठिकाणाहून सुमारे ६.६३ लाख रुपयांचा मुद्देमाल, संशयित द्रावण आणि एक कार जप्त करण्यात आली. चिंचवडमधील वाल्हेकरवाडी परिसरातील मंगल मूर्ती पान स्टॉलवरूनही ७१० ग्रॅम अंमली पदार्थ मिश्रित पावडर जप्त करत ज्ञानेश्वर वानखेडे याला अटक करण्यात आली आहे.

या कारवाईमागे नागरिकांच्या तक्रारी निर्णायक ठरल्या. पान खाल्ल्यानंतर अचानक गुंगी येणे, चक्कर येणे अशा तक्रारी वाढत होत्या. यानंतर पोलिसांनी पोर्टेबल ड्रग्ज टेस्टिंग किटचा वापर करून घटनास्थळीच तपासणी केली आणि हा प्रकार उघडकीस आणला.

या प्रकरणातून शहरात अंमली पदार्थांचा वाढता धोका अधोरेखित झाला आहे. सहज उपलब्ध असलेल्या पानासारख्या पदार्थातून नशा पुरवली जात असल्याने विशेषतः तरुणांवर याचा गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पोलिस आता या रॅकेटचा मुख्य सूत्रधार आणि त्यामागील आंतरराज्य साखळीचा शोध घेत आहेत.